# प्रॉस्पेक्टस

# आधार निवासी संकुल
प्रौढ बौद्धिक दिव्यांगांसाठी आजीवन निवास  व्यवस्था

## असोसिएशन ऑफ पेरेंट्स ऑफ मेंटली रिटार्डेड चिल्ड्रेन
च्या विश्वस्त मंडळाचे देखरेखी अंतर्गत
ठाणे, नाशिक आणि सातारा जिल्ह्यात कार्यरत





**मुख्य कार्यालय: (APMRC)**
301, गिरी हेवन बिल्डिंग, हरिनिवास सर्कल, एलबीएस मार्ग, ठाणे (प.) 400 602
संपर्क: 9987322050 / (022) 2542 6753 / 25341708

## आधार – विशेष मुलांसाठी विशेष घर

आधार ही प्रौढ मतिमंद व्यक्तींना आजीवन देखभाल प्रदान करणारी अग्रगण्य ना-नफा संस्था आहे. 1994 मध्ये स्थापन झाल्यापासून, आधार भारतातील सर्वात मोठ्या आणि विश्वासार्ह संस्थांपैकी एक बनली आहे. महाराष्ट्रातील तीन केंद्रे - बदलापूर, नाशिक आणि 17 एप्रिल 2024 रोजी सुरू झालेले सातारा केंद्र - यामधून संस्था कार्यरत आहे.

आधार सध्या 18 ते 82 वयोगटातील 340 रहिवाशांची काळजी घेत आहे. सुरक्षित आणि प्रेमळ वातावरण प्रदान करण्याबरोबरच, ग्रामीण भागात 270 हून अधिक रोजगार निर्माण करून समाजावरही सकारात्मक प्रभाव पाडत आहे, यामध्ये 84 महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. याशिवाय, आधार सोलापूर आणि जळगावमधील दोन संस्थांना मदत करत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ कुटुंबांना आधार देते. दरवर्षी, भारतातील 18 राज्यांमध्ये जवळपास 2000 लोकांपर्यंत संस्था थेट पोहोचते.

आधारच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत भारत सरकारने 2014 मध्ये 'अपंगांसाठी उत्कृष्ट संस्था' हा पुरस्कार प्रदान केला होता, जो तत्कालीन राष्ट्रपती श्री. प्रणब मुखर्जी यांच्या हस्ते देण्यात आला. नवोन्मेषी दृष्टिकोन आणि समर्पित सेवेद्वारे, आधार मतिमंद व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य सातत्याने करत आहे आणि संवेदनशील देखभालीसाठी एक उच्च मानदंड प्रस्थापित करत आहे.

**आधारचा इतिहास:**

दिवंगत श्री. माधवराव गोरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे स्थापन झालेली आधार ही मतिमंद व्यक्तींसाठी आजीवन संगोपन आणि देखभाल घेणारी अग्रगण्य संस्था आहे. त्यांच्या कुटुंबीयांची काळजी दूर करण्याच्या उद्देशाने, 1990 मध्ये आधारची स्थापना सार्वजनिक ट्रस्ट म्हणून करण्यात आली. विशेष म्हणजे, एकूण अकरा विश्वस्तांपैकी आठ जण हे मतिमंद व्यक्तींचे पालक किंवा नातेवाईक आहेत.

सुरुवातीच्या साध्या प्रवासातून, आधार आज आशेचा एक दीपस्तंभ बनला आहे. संस्थेने सन्मान, सुरक्षितता आणि आजीवन देखभाल यावर आधारित एक समग्र सेवा मॉडेल विकसित केले आहे. सध्या बदलापूर, नाशिक आणि सातारा येथे कार्यरत असलेल्या केंद्रांमधून 340 विशेष मुलांची काळजी घेतली जाते, ज्यामध्ये 275 हून अधिक समर्पित कर्मचारी अहोरात्र सेवा देत आहेत. थेरपी, कौशल्य विकास आणि समाजसंपर्क यावर भर देत, आधार सतत आपल्या सेवा क्षेत्राचा विस्तार करत आहे, जेणेकरून मतिमंद व्यक्तींना एक सन्माननीय आणि आत्मनिर्भर जीवन जगता येईल.

**फक्त निवासा पेक्षा अधिक काही:**

आधार ही केवळ निवासाची सोय नसून, एक प्रेमळ घर आहे, जिथे सन्मान, सुरक्षितता आणि संधी मिळतात. मतिमंद व्यक्तींसाठी सुरक्षित, पोषक आणि सक्षम करणारे वातावरण निर्माण करण्यासाठी आधारची सर्व केंद्रे काळजीपूर्वक विकसित केली गेली आहेत. या केंद्रांमध्ये आरामदायक निवासी व्यवस्था, विशेष वैद्यकीय सेवा, व्यवसायिक प्रशिक्षण कार्यक्रम, सुसज्ज स्वयंपाकघर व भोजन कक्ष, तसेच पुरेशा मनोरंजन सुविधा उपलब्ध आहेत, जेणेकरून रहिवाश्यांना सामाजिक सहभाग व वैयक्तिक प्रगतीसाठी संधी मिळेल.

मात्र, आधार केवळ मूलभूत सेवा पुरवण्यापुरता मर्यादित नाही—तर येथे स्वावलंबन, आत्मविश्वास आणि कौशल्य विकासावर भर दिला जातो, जेणेकरून रहिवाश्यांना अर्थपूर्ण जीवन जगता येईल. संरचित उपक्रम, थेरपी सत्रे आणि समावेशक वातावरणाच्या माध्यमातून, आधार प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या क्षमतेनुसार विकसित होण्यासाठी आवश्यक आधार देतो, जेणेकरून ते स्वतःच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचू शकतील.

**आशेचा किरण:**

"आधार ही गेल्या ३० वर्षांपासून फक्त बौद्धिक अपंगांसाठी कार्य करणारी भारतातील सर्वात मोठी एनजीओ आहे. संस्थेअंतर्गत बदलापूर आणि नाशिक अशा दोन केंद्रांचे व्यवस्थापन केले जाते तसेच सोलापूर आणि जळगावमधील दोन अतिरिक्त संस्थांना मदत करून, दुर्गम भागातील वंचित मुलांपर्यंत देखील संस्था पोहोचली आहे". आधारचे अध्यक्ष श्री विश्वास गोरे म्हणतात. "पाच जिल्ह्यांतील 400 हून अधिक कुटुंबांना दिलासा देणारी आम्ही एकमेव पालकांच्या नेतृत्वाखालील संघटना आहोत. आमचे देणगीदार, हितचिंतक, पालक आणि कर्मचारी यांचा अखंड पाठिंबा अमूल्य आहे आणि आम्ही त्यांच्या योगदानाबद्दल सदैव कृतज्ञ आहोत."

## I प्रवेशासाठी नियमावली:

1. ज्या पालकांना त्यांच्या पाल्यासाठी संस्थेच्या आधार प्रकल्पा मध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी विहित नमुन्यात प्रवेश अर्ज सादर करणे गरजेचे असून खाली नमूद केलेल्या कागदपतरी आणि अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे -

    a. ज्या प्रवेश घेणारा पाल्य हा मतिमंद असल्याचा मानसोपचार / मानसशास्त्र तज्ज्ञ यांचा दाखला (आधारच्या मानसोपचार तज्ज्ञांच्या शिफारशी नुसार प्रवेश दिला जाईल)
    b. प्रमाणित आणि साक्षांकित जन्म दाखला. पाल्याचे वय १८ वर्षे पूर्ण असावे.
    c. पालकाने त्याच्या गैरहजेरीत पाल्याविषयीचे सर्व अधिकार ज्या व्यक्तीस सुपूर्त करावयाचे आहेत त्या व्यक्तीच्या नावाने नामांकनाचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र रु. १०० च्या स्टॅम्पपेपरवर (प्रपत्राचा नमुना संलग्न).
    d. पालकांचे उत्पन्नाचे आर्थिक विवरण (फॉर्म 16 मध्ये ), इच्छापत्र, पेन्शन, पाल्यासाठी विमा तरतूद किंवा अन्य आर्थिक गुंतवणूक केली असल्यास त्याच्या प्रमाणित प्रति जोडणे आवश्यक आहे. (सदर माहिती गोपनीय ठेवली जाईल)
    e. पाल्य जर मुलगी / स्त्री असेल तर पालकांनी प्रवेश करण्यापूर्वी पाल्याचे गर्भाशयाचे (हिस्टेरेक्टोमी) ऑपरेशन करून घेणे आणि त्यासाठीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे. (योग्य स्वच्छता तसेच स्वतःचे आणि इतरांचे आरोग्य राखणे आणि प्रभागाची अनावश्यक गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक आहे.)

2. प्रवेशासंबंधीचे सर्व अधिकार असोसिएशनचे विश्वस्त मंडळ यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत. प्रवेश नाकारण्याची कारणे देणे संस्थेस बंधनकारक नाही.

3. पाल्याची मासिक फी भरण्याचे पर्याय स्वतंत्रपणे संलग्न केले आहेत.

4. पालकांनी पाल्याची मासिक फी आणि इतर खर्च प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपूर्वी भरणे अनिवार्य आहे.

5. पाल्यासाठी स्वतंत्रपणे केलेल्या कोणत्याही वैद्यकीय उपचारांसाठी, विशेष आहारासाठी, रुग्णालयात दाखल करण्यासाठी किंवा विविध चाचण्यांसाठी येणारा वैद्यकीय खर्च पालकांनी / पालनकर्त्याने उचलावयाचा आहे.

6. रुग्णालयात दाखल झाल्यास फक्त 3 दिवसांसाठी आधारचे कर्मचारी पुरवले जातील. त्यानंतर रूग्णालयात काळजी घेणारे कर्मचारी पुरवण्यासाठी पालकांना प्रतिदिन रु. 1500/- याप्रमाणे शुल्क आकारले जाईल

7. निवासी जागेची किंवा इतर सुविधांची उपलब्धता लक्षात घेऊन आधारच्या सक्षम अधिकारी यांच्या गृहभेटीनंतर तात्पुरता प्रवेश मंजूर करण्यात येईल. सादर तात्पुरता प्रवेश एका महिन्याच्या आत (३० दिवस) दोन्ही बाजूंनी रद्द करण्यास मुभा असेल. या तात्पुरत्या काळात संस्थेने केलेला देखभाल / इतर खर्च वजा करून अशा परिस्थितीत प्रभागाची देखभाल आणि वैद्यकीय खर्च वजा करून प्रवेश फी आणि सुरक्षा ठेव परत केली जाईल.

### II संस्थेतील उपलब्ध सोयी व सुविधा:

आधार संस्थेत खालील सोयी व सुविधा उपलब्ध केल्या जातील

1. वैयक्तिक काळजी आणि स्वच्छता
2. मानसिक रोग तज्ज्ञ यांच्याकडून विश्लेषण आणि औषधोचार
3. मानसोपचार तज्ञ सल्ला, उपचार आणि पाठपुरावा
4. संतुलित आहार, उपचारात्मक विशेष आहार
5. फिजिओ थेरपी, योग आणि ध्यान
6. दातांची काळजी, तपासणी आणि पाठपुरावा
7. नियमित वैद्यकीय तपासणी आणि पाठपुरावा, चोवीस तास नर्सिंग सेवा
8. नृत्य आणि सांस्कृतिक उपक्रम
9. विशेष मुलांसाठी विशेष वर्ग
10. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र सुविधा
11. खेळ, स्पर्धा आणि सहलीचे आयोजन
12. केंद्रीकृत संगीत आणि मनोरंजन

### III रजा आणि प्रवेश रद्द करण्यासंबंधीचे नियम / अटी:

पालक/पालनकर्ता संचालकांच्या पूर्वपरवानगीने मुलांना रजेवर घेऊ शकतात. रजा कालावधी दरम्यान देखभाल शुल्क खालीलप्रमाणे आकारले जाईल:

1. रजेच्या कालावधीत पालकांना संपूर्ण शुल्क भरावे लागणार आहे.
2. पालक पूर्व परवानगीने रजेचा कालावधी कमाल 6 महिन्यांपर्यंत वाढवू शकतात.
3. 6व्या महिन्याची मुदत संपण्यापूर्वी पालकांना/पालनकर्ता यांना त्यांच्या पाल्याच्या रजेचे कारण लेखी पत्राद्वारे द्यावे लागेल. विश्वस्तमंडळाच्या संमती नंतरच हि राजा मंजूर केली जाईल.
4. वरीलप्रमाणे पाल्याची रजा मंजूर करून घेतली नसल्यास, अशा पाल्याचे नाव संस्थेच्या पटलावरून कोणतीही पूर्वसूचना न देता कमी करण्यात येईल.
5. पालक/पालनकर्त्यास आधार पटलावरून नाव काढून टाकल्याच्या तारखेपर्यंतच्या सर्व थकबाकीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.
6. पाल्याचे आधारमधून नाव काढल्यानंतर किंवा प्रवेश रद्द केल्यानंतर, पालक/पालनकर्त्याने पुन्हा प्रवेश मागितल्यास, तो नवीन प्रवेश मानला जाईल आणि त्या वेळी प्रचलित असलेली प्रवेश फी आणि सुरक्षा ठेव रक्कम पुनर्प्रवेशाच्या वेळी भरणे क्रमप्राप्त असेल.
7. मूळ पावती दिल्यावरच सुरक्षा ठेव परत केली जाईल.

### IV पालक/पालकांसाठी सामान्य नियम:

1. आजारपण, अपघात किंवा आणीबाणीच्या परिस्थितीत, असोसिएशनला पालक/पालनकर्त्याच्या पूर्व संमतीशिवाय आणि आवश्यक असल्यास भूल किंवा शस्त्रक्रियेची अधिकृत अधिकृतता न घेता पाल्यास योग्य संस्थेत हलविण्याचा अधिकार आहे.

2. असोसिएशन वॉर्डच्या हितासाठी सर्व काळजी आणि खबरदारी घेईलच, तरीही अपवादात्मक प्रसंगी पाल्यास शारीरिक किंवा मानसिक इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
   a परिसराच्या आत किंवा बाहेर अपघात
   b पिकनिकला किंवा बाहेरगावी जाताना रस्ते अपघात
   c अनपेक्षित किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे अपघात.
   
   अशा कोणत्याही अनपेक्षित घटनांमध्ये आधार प्राधिकरण जबाबदार राहणार नाही तसेच खर्चाची जबाबदारी ही संस्थेची असणार नाही.

3. आमच्या कार्यक्षेत्राच्या पलीकडे हॉस्पिटलायझेशन (बदलापूर ते ठाणे) किंवा (साकुरफाटा ते नाशिक) आणि (सातारा ते कराड) ही पालकांची जबाबदारी आहे. रुग्णालयात दाखल करताना पालक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असणे अपेक्षित आहे.

4. बाहेरील सहली किंवा एस्कॉर्टिंग इत्यादीसाठी संस्थेतील कर्मचाऱ्यांची मदत उपलब्ध करून दिली जाणार नाही.

5. संस्थेच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार औषधे किंवा इतर वैद्यकीय सेवा पुरविल्या जातील.

6. पालकांनी त्यांच्या पाल्याजवळ रोख रक्कम, दागिने किंवा कोणतीही मौल्यवान वस्तू ठेवू नये.

7. पालकांना सूचित केले जाते की कोणत्याही कर्मचाऱ्यास वैयक्तिक रित्या रोख किंवा भेटवस्तू स्वरूपात बक्षीस देण्यास सक्त मनाई आहे.

8. असोसिएशन योग्य वाटेल त्याप्रमाणे शैक्षणिक किंवा व्यावसायिक प्रशिक्षण क्रियाकलापांमध्ये मुलांना सहभागी करून घेण्यास मुक्त आहे. पालक किंवा पालनकर्ता अशा क्रियाकलापांद्वारे कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याचा दावा करू शकत नाहीत.

9. दोन महिन्यातून किमान एकदा शनिवार/रविवारी कामाच्या वेळेत पालक/पालकांनी त्यांच्या पाल्यास भेट देणे अपेक्षित आहे.

10. पालक जेव्हा त्यांच्या पाल्यास भेट देतात तेव्हा त्यांना हलका अल्पोपहार इ. देऊ शकतात, असे सूचित केले जाते की पालकांनी त्यांच्या पाल्यास खाजगीरित्या खायला द्यावे. पालकांना पाल्यास जास्त / जड आहार न देण्यास विनंती केली जाते.

11. कागदपत्रांवर स्वाक्षरी केलेले पालक/पालनकर्ता यांचे निधन झाल्यास हयात असलेले पालक मूळ अर्जदाराच्या जागी पर्यायी पालकाबद्दल आधारला ताबडतोब लेखी कळवतील.

12. जर संस्थेत असलेल्या पाल्याचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास, उपलब्ध जलद मार्गाने पालक/पालनकर्त्यास कळवण्याची काळजी संस्थेकडून घेतली जाईल. मात्र पालकांना येण्यास बराच उशीर झाल्यास किंवा येणे अशक्य असल्यास, योग्य वैद्यकीय प्रमाणपत्रासह सन्माननीय पद्धतीने मृतदेहाचा अंत्यसंस्कार विधी संस्थेकडून केला जाईल.

13. जर पालकांचा दूरध्वनी क्रमांक, संपर्क पत्ता किंवा परदेशात प्रवास करताना कोणताही बदल झाल्यास, पालकांनी/पालनकर्त्याने त्याबद्दल आधारला आधीच माहिती देणे अपेक्षित आहे.

14. पाल्याकडून संस्थेच्या मालमत्तेचे (इमारत, फर्निचर, विजेची किंवा इतर उपकरणे इ.) नुकसान झाल्यास पालक/पालनकर्ता यांचेकडून संस्थेची झालेली नुकसान भरपाई करून घेण्यात येईल.

15. आधार संस्थेचे व्यवस्थापन मूलतः पालक संघाद्वारे केले जात असल्याने, आधारच्या विकासासाठी प्रत्येक पालकाने संस्थेच्या कार्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष योगदान करणे आवश्यक आहे. प्रत्येक पालकांकडून योग्य मार्गदर्शन, निधी संकलन, संस्थेच्या कार्याची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे, जाहिराती मिळविणे इ. साठी सहकार्य अपेक्षित आहे. मदत करू इच्छिणाऱ्या पालकांनी ठाणे कार्यालयात तपशीलासाठी अध्यक्षांशी संपर्क साधावा.

मी, वरील I ते IV नुसार तयार केलेले सर्व नियम आणि पोटनियम वाचले असून मला ते मान्य आहेत. त्यांचे पालन मी कटाक्षाने करेन. सदर नियमावलीत आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी सुधारणा करण्याचा अधिकार असोसिएशन राखून ठेवले आहेत हे मी जाणतो.

माझ्यासमोर सही केली

संचालक / अधिकारी / समाजसेवक

तारीख ____________________

पालक / पालनकर्ता

तारीख __________________

पत्ता ___________________

_____________________

_____________________

_____________________

मोबाईल __________________

## सभासदत्वाचा अर्ज

1. अर्जदाराचे पूर्ण नाव :..........................................................................................
2. निवासी पत्ता :..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
3. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :..........................................................................................
4. ईमेल आयडी आणि पॅन क्रमांक :..........................................................................................
5. कार्यालयाचा पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
6. पाल्याशी नाते :..........................................................................................
7. पाल्याचे नाव :..........................................................................................
8. पाल्याचा बौद्धिक मूल्यांक :..........................................................................................
9. भावंडांची संख्या :..........................................................................................

(कृपया सर्व भावंडांचा उल्लेख करा - भावंड 2 पेक्षा जास्त असल्यास स्वतंत्र पत्रक संलग्न करा)

10. भावंडाचे नाव - 1 :..........................................................................................
पत्ता / संपर्क क्रमांक/ ईमेल आणि व्यवसाय :..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

11. भावंडाचे नाव – 2 :..........................................................................................
पत्ता / संपर्क क्रमांक/ ईमेल आणि व्यवसाय ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

12.नामांकित व्यक्तीचे नाव / पत्ता / संपर्क क्रमांक/ ईमेल ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

11. नामांकित व्यक्तीचे अर्जदाराशी नाते :..........................................................................................

मला संघटनेचे आजीवन सदस्य व्हायचे आहे. सदस्यत्व शुल्कासाठी रु. ५०००/- चा चेक/डीडी / ऑनलाईन हस्तांतरित केल्याचा पुरावा संलग्न आहे.

तारीख: पालक / पालनकर्ता स्वाक्षरी

# प्रवेश अर्ज

1. पाल्याचे नाव: ______________________________
2. जन्मतारीख: ______________________________
3. शारीरिक माहिती: ______________________________
   उंची:____________________ वजन: ____________________
4. मतिमंदत्वा व्यतिरिक्त इतर व्यंग
   - दृष्टी दोष: ______________________________
   - ऐकण्याची क्षमता: ______________________________
   - वाचा दोष: ______________________________
   - चालण्यात दोष:______________________________
5. दिनचर्या
   - झोपण्याची वेळ (अंथरूण ओले करण्याची सवय):____________________
   - जेवण (शाकाहारी / मांसाहारी):____________________
   - जेवण (स्वावलंबी / परावलंबी):____________________
   - आंघोळ/शौचालय (स्वावलंबी / परावलंबी):____________________
   - कपडे (स्वावलंबी / परावलंबी): ____________________
   - आणखी कोणत्या प्रकारची मदत आवश्यक आहे:____________________
     ______________________________
     ______________________________
     ______________________________
6. आरोग्य
   - बुध्यांक:
     ______________________________
   - फिट येत असल्यास त्याचे प्रमाण (वारंवारता):____________________
   - मानसोपचार चालू असल्यास तज्ज्ञांचे नाव आणि संपर्क क्रमांक:____________________
     ______________________________
     ______________________________
   - इतर काही आजार: ______________________________
7. सध्या तो/ती काय करत आहे) याचा तपशील द्या
   ______________________________
   ______________________________
   ______________________________
   ______________________________

तारीख: ____________________ पालक / पालनकर्ता स्वाक्षरी: ____________________

# आवश्यक कागदपत्रे:

**महत्त्वाचे:**

1. पाल्याचे UDID प्रमाणपत्र आणि बुध्यांक चाचणी प्रमाणपत्र (सरकारी रुग्णालयचे)
2. पालक / पालनकर्ता तसेच त्यांच्या अनुपस्थितीत जबाबदार व्यक्ती असेल त्यांचे पॅन, आधार कार्ड आणि उत्पन्नाचा पुरावा (IT Return).
3. नॉमिनीचे स्वीकृती पत्र रु. 100/- स्टॅम्प पेपर वर नॉमिनेशन (notarized).
4. पाल्याच्या आधार मधील वास्तव्यादरम्यान देखभाल खर्चाच्या नियमित भुगतानासाठी दीर्घकालीन आर्थिक तरतूदीची योजना केली असल्यास तसा पुरावा किंवा नसल्यास त्यासाठी कशी तरतूद करणार आहात त्यासंबंधीचे लेखी विवरण.

**सामान्य:**

1. सदस्यत्व फॉर्म आणि प्रवेश फॉर्म रीतसर भरलेला
2. असोसिएशनचे नियम आणि पोट नियम स्वीकार केलेले पालकांकडून रीतसर स्वाक्षरी असलेले दस्तावेज
3. पालक/ पालनकर्ता यांचे पॅन कार्ड आणि आधार कार्डची झेरॉक्स प्रत
4. रेशन कार्डची झेरॉक्स प्रत (पालक/ पालनकर्ता)
5. पालक/ पालनकर्ता यांचा इलेक्ट्रिक बिलाची झेरॉक्स प्रत किंवा इतर कोणत्याही पत्त्याचा पुरावा
5. जन्म प्रमाणपत्र (पाल्य / आयडी चाइल्ड)
6. मानसशास्त्रीय अहवाल (पाल्य / आयडी चाइल्ड)
7. आधार कार्ड (पाल्य / आयडी चाइल्ड)
8. पास पोर्ट साइज फोटो -3 (पाल्य / आयडी चाइल्ड)
9. पासपोर्ट आकाराचा फोटो -1 (आई)
10. पासपोर्ट आकाराचा फोटो -1 (वडिल)
11. कौटुंबिक फोटो -1 (पोस्टकार्ड साईज / किंवा कुटुंबातील सदस्यांची स्वतंत्र छायाचित्रे)

**वैद्यकीय**

(मूळप्रती प्रवेशाच्या वेळी सादर करता येतील)

1. औषधे (चालूअसल्यास) 1 महिन्यासाठी साठा
2. वैद्यकीय अहवाल
   a. छातीचा एक्स-रे
   b रक्त तपासणी (WBC, साखर, ESR.)
   c मूत्र चाचणी
   d मूत्रपिंड चाचणी
   e काही विशिष्ट रोग असल्यास कृपया वर्णन करा (पेपर संलग्न करा)

**कपडे आणि इतर आवश्यक सामान:**

| | | |
|---|---|---|
| 1. | कपडे | 4 जोड्या |
| 2. | टॉवेल | 1 |
| 3. | ब्लँकेट | 1 |
| 4. | पांघरूण | 1 |
| 5. | आतील पोशाख | 4 सेट |
| 6. | बेडशीट | 2 |
| 7. | टूथब्रश | 1 |
| 8. | पिलो कव्हर्स | 2 |
| 9. | स्वेटर | 1 |
| 10. | लोकरीची माकड टोपी | 1 |

**आर्थिक बाबी आणि देखभाल खर्च**

1. आधार येथे त्यांच्या पाल्यासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांनी रु. **5000/-** (रु. पाच हजार फक्त) भरून संघटनेचे आजीवन सदस्य म्हणून नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

2. प्रवेश शुल्क रु. **1,00,000/- (**रु. फक्त एक लाख**)**

3. सुरक्षा ठेव रु. **50000/-** (रु. पन्नास हजार फक्त) (केवळ मूळ पावती सादर केल्यावर परत करता येईल)

4. 'प्रतीक्षा यादी' चालू असल्यास, नाव नोंदणीसाठी देयक अटी खालीलप्रमाणे आहेत -

   - पहिला हप्ता रु. **55000/-** (ज्यात आजीवन-सदस्यत्व शुल्क रु. **5000/-** + ५०% प्रवेश शुल्क रु. **50000/**) भरून प्रतीक्षा यादीत नाव नोंदविणे.

   - दुसरा हप्ता रु.**1,00,000/-** प्रवेशाच्या तारखेच्या पुष्टीकरणावर भरावे लागतील (म्हणजे रु. **50000/-** शिल्लक प्रवेश शुल्क + सुरक्षा ठेव रु. **50000/-**).

   - वास्तविक प्रवेशासाठी ६-१२ महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

   - प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल.

5. आर्थिक वर्ष **2024-25** (एप्रिल **2024** पासून) साठी मासिक देखभाल शुल्क रु. **17000/-** (रु.सतरा हजार रुपये फक्त) (यात परिस्थितीनुरूप बदल) + वास्तविकतेनुसार वैद्यकीय खर्च. बाहेरगावी राहणाऱ्या पालकांनी वेळच्यावेळी ऑनलाईन पेमेंट करावे.

6. पालक संघटनेचे सदस्य या नात्याने प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे कि त्याने संस्थेसाठी निधीसंकलनाच्या कार्यात सहभागी व्हावे जेणेकरून विश्वस्त मंडळाला देखभाल शुल्क निश्चित राखता येईल आणि त्यासाठी निधी उभारता येईल. तसेच विविध विकास प्रकल्पांच्या निधीसंकलन आणि इतर सहभागासाठी हातभार लावणे अपेक्षित आहे.

## नामांकनासाठी प्रोफॉर्मा

(रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर टाइप करून नोटरी स्वाक्षरी करून घेणे)

माझा पाल्य (पाल्याचे संपूर्ण नाव) ह्याचे संबंधात मी श्री./सौ. (पालकांचे नाव) पालक/पालनकर्ता या नात्याने, श्री/श्रीमती (नामनिर्देशित व्यक्तीचे नाव) यांना माझ्या अनुपस्थितीत माझ्या मुलाची/मुलीची (पाल्याचे नाव) संपूर्ण जबाबदारी प्रदान करत आहे.

माझ्या अनुपस्थितीत माझ्या मुलाची/मुलीची (पाल्याचे नाव) देखभाल / औषधोपचार / शल्य चिकित्सा / हॉस्पिटलैझेशन इत्यादी खर्चाची जबाबदारी घेण्यास श्री/श्रीमती (नामनिर्देशित व्यक्तीचे नाव) यांनी मान्यता दिली आहे.

माझ्या अनुपस्थितीत पालक म्हणून माझ्या मुलाचे/मुलीचे (पाल्याचे नाव) नामनिर्देशन स्वीकारण्यासाठी माझे नामनिर्देशित श्री/श्रीमती (नामनिर्देशित व्यक्तीचे नाव) यांची स्वाक्षरी माझ्या उपस्थितीत खाली दिली आहे.

(पालक / पालनकर्ता नाव आणि सही ) ____________________________________

मी श्री/श्रीमती (नामनिर्देशित व्यक्तीचे नाव) श्री./सौ. (पालकांचे नाव) यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या मुलाची/मुलीची (पाल्याचे नाव) वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण जबाबदारी स्वखुशीने स्वीकारत आहे.

नामांकित व्यक्तीचे छायाचित्र

नामनिर्देशित व्यक्तीची स्वाक्षरी ____________________________________
नाव / पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक / ____________________________________
नामांकित व्यक्तीचा ईमेल आयडी ____________________________________
____________________________________
____________________________________

कार्यालयाचा पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक ____________________________________
____________________________________
____________________________________
____________________________________

यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली
(नाव / पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक आणि ईमेल) ____________________________________
____________________________________
____________________________________
____________________________________

साक्षीदाराची स्वाक्षरी ____________________________________

_____ दिनांक ________ माहे 20____ पालकाची स्वाक्षरी________________________

# आधारचे उद्दिष्ट

*प्रौढ बौद्धिक अपंग व्यक्तींच्या पालकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्या विशेष पाल्यासाठी आजीवन निवारा आणि संगोपनाची प्रदान करणे.*

# आधारचे ध्येय

*प्रौढ बौद्धिक अपंग व्यक्तींच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे तसेच त्यांचे संरक्षण, सर्वांगीण विकास आणि जीवन समृद्ध करण्यासाठी सातत्याने कार्यरत राहणे.*

**मुख्य कार्यालय (APMRC, ठाणे)**
301, गिरी हेवन,
हरी निवास सर्कल , LBS मार्ग,
माले दवाखान्या जवळ, ठाणे (प) 400602
संपर्क: 25426753 / 25411708

**बदलापूर प्रकल्प: (आधार)**
ठाकूरवाडी, गाव मुळगाव अस्नोली फाटा,
बारवी डॅम रोड, बदलापूर (प.) ठाणे 421 503
बदलापूर (प.) ठाणे 421 503
संपर्क: 9869412311/8928005282/80

**नाशिक प्रकल्प: (आधार II)**
गट क्र. 286, पिंपळगाव (डुक्रा) घोटी
सिन्नर रोड, इंडियन ऑइल पेट्रोल पंपच्या
मागे ता. इगतपुरी, जि. नाशिक 422502
संपर्क: 7447476047

**सातारा प्रकल्प (आधार III)**
गट क्रमांक 922, गाव हरपळवाडी,
नागठाणे नाका, सातारा-कराड महामार्ग,
ता. कराड, जि. सातारा 415014
संपर्क: 8928005273 / 9823551967

वेबसाइट: https://adhar.org

फेसबुक: https://www.facebook.com/AdharHome
इंस्टाग्राम: https://www.instagram.com/adharhome/
युट्यूब: https://www.youtube.com/@Adharhome
लिंक्डइन: https://bit.ly/40PW4Xe

# What after me?



## Who will take care of my child?

I will look after my mentally handicapped child,
as long as I can. But what if I am no longer there?

**Haunting questions for parents of intellectually challenged children…**

Such parents can now handle these vexing concerns much better… "**Adhar**" is there to help, with a

**Life-time shelter for the intellectually challenged**

**Adhar** provides Homes- permanent residential facilities- to intellectually challenged children aged between 18 and 70
**Adhar** is a 31-years old NGO, runs such Homes at Badlapur (235 Special Residents), Nasik (100 Special Residents) and Satara (16 Special Residents)
**Adhar** has to its credit the Best Parents' Association Award given by the National Trust for 2006-07
**Adhar** has been recognized as Best NGO in India across all Disabilities for 2014-15 by President of India

"**Adhar**" runs life-long "home away from home" for intellectually challenged children

- 100% relief to parents- can rest assured that their intellectually challenged child is being genuinely cared for
- Expert Support to children- 2 Staff members for every 3 Children, medical facilities etc.
- Provides Financial relief through concessions in monthly outgo to deserving cases

Adhar's Badlapur Home was set up in 1994, Nasik Home in 2012, opened a new unit at Satara District in Maharashtra for 100 intellectually challenged persons from April 2024.
Adhar is run by the parents of intellectually challenged children, for such parents, with society's involvement and support
It receives no Government aid, runs only on donations, parental contributions and your goodwill

**In any case you too can have a role in Adhar. Here is how …..**

If you are a parent of an intellectually challenged child, become an Adhar member; admit your child in the Adhar Homes at Badlapur, Nashik or Satara.

- Donate to Adhar. It qualifies you for a deduction in income tax under section 80G
- Procure donations for Adhar from your friends and associates
- Publicize the great work that Adhar is doing and help us to spread the word.
- Personally participate in Adhar's work. Our children will be grateful to you.

**Please do contact Adhar…We value your contribution greatly …Thanks a lot!**

## Association of Parents of Mentally Retarded Children (Adhar)

**Head Office** – 301, Giri Heaven, Hari Niwas Circle, LBS Road, Near Male Hospital, Thane (W) 400602
**Telephone:** 2542 6753, 2541 1708 Email: vishwasgore@adhar.org Website: https://www.adhar.org

**Facebook:** https://www.facebook.com/AdharHome